अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. २९ नोव्हेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ६० वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## ऋतुराज बरसला पण भारत हरला!



गुवाहाटी : अखरेच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारतावर ५ विकेटनी विजय मिळवला. भारताने दिलेल्या २२३ धावांचा डोंगर ऑस्ट्रेलियाने ग्लेन मॅक्सवेलच्या शतकी खेळीने पार केला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने मालिकेतील आव्हान कायम ठेवले. पाच सामन्यांची मालिका २-१ अशा स्थितीत आहे. दोन्ही संघातील चौथी टी-२० मॅच रायपूर येथे १ डिसेंबर रोजी होणार आहे. भारताने दिलेल्या २२३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने धमाकेदार सुरुवात केली होती. पाचव्या षटकात अर्शदीप सिंगने आरोन हार्डीला १६ धावांवर माघारी पाठवले आणि संघाला पहिले यश मिळून दिले. त्यानंतर सहाव्या षटकात धोकादायक ट्रॅव्हिस हेडची विकेट घेऊन भारताच्या विजयातील मोठा अडथळा दूर केला. सातव्या षटकात भारताला रवी बिश्नोईने आणखी एक यश मिळून दिले. त्याने जोश इंग्लिसला १० धावांवर बोल्ड केले. यामुळे आक्रमक सुरुवात करणाऱ्या ऑस्ट्रेलियाची अवस्था ३ बाद ६८ अशी झाली. जोश इंग्लिस बाद झाल्यानंतर ग्लेन मॅक्सवेल आणि मार्कस स्टॉइनिस वेगाने धावा केल्या. ही जोडी अक्षर पटेलने फोडली. त्याने स्टॉइनिसला १७ धावांवर बाद केले. त्याच्या जागी आलेल्या टिम डेव्हिडला बिश्नोईने शून्यावर बाद केले. त्यानंतर मॅक्सवेल आणि कर्णधार वेड यांनी तुफानी फलंदाजी करून संघाला विजय मिळवून दिला.

# पत्नीसह मुलाची हत्या करून शिक्षकाने स्वत: केली आत्महत्या

- सोलापूर जिल्ह्यातील बार्शीतील घटना;
- शिक्षकाच्या अमानुषपणाने बार्शी हादरली

सुराज्य/बार्शी

**शहरातील उपळाई रोडवरील नाईकवाडी प्लॉट येथे शिक्षक पतीने आपल्या शिक्षक पत्नीचा गळा कापून व आपल्या अकरा वर्षाच्या मुलाच्या तोंडावर उशी ठेवून हत्या केली. त्यानंतर स्वतःही गळफास घेऊन आत्महत्या केली. अतुल सुमंत मुंढे (वय-४०), तृप्ती अतुल मुंढे (वय-३५) ओम सुमंत मुंढे (वय-११) असे त्या मयत तिघांची नावे आहेत. ही घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आल्याने बार्शी शहरात मोठी खळबळ उडाली आहे.**

अतुल मुंढे हे करमाळा तालुक्यात जिल्हा परिषद शाळेत शिक्षक होते. तर तृप्ती मुंढे या बार्शीतील अभिनव प्राथमिक शाळेत शिक्षिका होत्या. दोघेही उपळाई रोडवरील आपल्या घरात वरच्या मजल्यावर राहत होते. खालच्या मजल्यावर अतुल मुंढे यांचे आई- वडील राहतात. वरच्या मजल्यावरील कोणीही खाली न आल्याने अतुल यांच्या आई-वडिलांनी मंगळवारी सकाळी वर जाऊन पाहिले असता ही घटना उघडकीस आली. त्यानंतर तत्काळ बार्शी पोलिसांना कळविण्यात आले. पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले असून अधिकचा तपास सुरू आहेत. या घटनेचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी उपळाई रोडवरील नाईकवाडी प्लॉट येथे मोठी गर्दी झाली आहे. या घटनेने बार्शी शहरात व तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. बार्शी शहरातील नाईकवाडी प्लॉटमध्ये अतुल मुंडे हे आपल्या कुटुंबीयांसह राहत होते. तर त्यांच्या पत्नीदेखील शिक्षका होत्या. मात्र, आज अचानक मुंडे यांच्यासह त्यांच्या पत्नी आणि मुलाचा मृतदेह आढळून आला. दरम्यान, याची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. अतुल मुंडे यांनी पत्नी आणि मुलाची हत्या करून स्वत: आत्महत्या केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. परंतु, सर्वच बाजूने या घटनेचा तपास करत आहे.





या संदर्भत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सदर पती अतुल मूंढे याच्या विरोधात यापूर्वी काही वर्षापूर्वी कलम ४९८ अन्वये गुन्हा दाखल केला होता व दोघांचे संबंध तणावयुक्त होते. या पती पत्नीच्या व मुलाच्या दुर्दैवी मृत्युमुळ परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### नेमकं काय घडलं?

बार्शीत घडलेल्या घटनेत अतुल सुमंत मुंडे (वय ४०), तृप्ती अतुल मुंडे (वय ३५) ओम सुमंत मुंडे (वय ५) या तिघांचा मृत्यू झाला आहे. अतुल मुंडे यांनी पत्नी तृप्ती यांची गळा कापून हत्या केली. मुलगा सुमंत याच्या तोंडावर उशी ठेवून हत्या केली. त्यानंतर स्वतः गळफास घेत आत्महत्या केली. अतुल मुंडे हे करमाळा तालुक्यात जिल्हा परिषद शाळेत शिक्षक होते. तृप्ती मुंढे या बार्शीतील अभिनव प्राथमिक शाळेत शिक्षिका होत्या. अतुल मुंडे यांनी हे कृत्य का केले याबाबतीत पोलीस तपास करीत आहेत.

### परिसरात खळबळ...


शिक्षक मुंडे दांपत्य मागील काही वर्षांपासून बार्शी शहरात रहात होते. मात्र, अतुल मुंडे यांच्यासह त्यांच्या पत्नी आणि मुलाचे मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान, याची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. तर, पोलीस देखील घटनास्थळी पोहचले आहेत. सोबतच वरिष्ठ पोलीस अधिकारी देखील घटनास्थळी आले आहेत. या घटनेने परिसरात मात्र खळबळ उडाली आहे. पोलीस आता सर्वच बाजूने तपास करत आहेत.

## पत्नीचे विवाहबाह्य संबंधामुळे पतीने केली आत्महत्या

### कोटा नगररातील घटना चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

पत्नीचे विवाहबाह्य संबंध अन् त्यातून जीवे मारण्याचा प्रयत्न या दुहेरी कारणातून एका तरुणानं आत्महत्या केली. हा प्रकार जुन्या विडी घरकुलातील कोटा नगरात घडली.



मृताच्या पॅन्टच्या खिशात सापडलेल्या 'सुसाईड नोट' वरून उघडकीस आला. याप्रकरणी दाखल फिर्यादीनुसार मृताची पत्नी व अन्य तिघांविरुद्ध एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जुना विडी घरकुल, प्रशांत वसंत इंदापुरे याने मंगळवारी सकाळपूर्वी राहत्या घराच्या पहिल्या मजल्यावरील खोलीत साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याच्या खिशात सापडलेल्या सुसाईड नोटवरून, त्याने पत्नीचे त्रयस्थाशी असलेले विवाहबाह्य संबंध आणि उभयतांबरोबर तिच्या अन्य नातेवाईकांनी त्यास जीवे मारण्याचा केलेला प्रयत्न त्यास कंटाळून आत्महत्या केल्याचा उल्लेख केलेला होता. प्रशांत इंदापुरे याची पत्नी अस्मिता ही पतीबरोबर वाद-विवाह करून तिच्या माहेरी धनकवडी, पुणे येथे वास्तव्यास होती. हा प्रकार २०२१ ते २१ नोव्हेंबर २०२३ दरम्यान वेळोवेळी घडला. तिच्या माहेरच्या तिघांनी प्रशांतला जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता, त्यास कंटाळून टोकाचे पाऊल उचलत स्वतःची जीवन यात्रा संपवली.

या चौघांमुळे मी फाशी घेतोय, त्यांनी जीवे मारण्याचा प्रयत्न केला, मेन्टली टॉर्चर केले आहे.' म्हणून त्या चिठ्ठीत लिहिल्याने मृत प्रशांतचा भाऊ नितीन वसंत इंदापुरे (वय-३४ वर्षे) याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार अक्षय महांकाळ, अक्षय काडगी, अस्मिता इंदापुरे, ज्ञानेश्वर काडगी या चौघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

## आनंदाची बातमी : उत्तरकाशीतील बोगद्यात १७ दिवसांपासून अडकलेले ४१ मजूर बाहेर

सुराज्य/उत्तराखंड

उत्तराखंडच्या बोगद्यामध्ये गेल्या १७ दिवसापासून अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी एनडीआरएफचे प्रयत्न सुरू होते. अडकलेल्या ४१ कामगारांपर्यंत पाईप टाकण्यात आला होता. एनडीआरएफ देखील त्यांच्या पर्यंत पोहोचली आहे, आता एनडीआरएफच्या प्रयत्नांना यश आले आहे. एक आनंदाची बातमी समोर आली आहे. अडकलेल्या सर्व ४१ मजुरांना बाहेर काढण्यात एनडीआरएफला यश आले आहे.



उत्तराखंडमधील उत्तरकाशीमध्ये बोगद्यात अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्याचे काम सुरू झाले आहे. बचाव पथकांनी बोगद्याच्या वरून खोदकाम आणि उभ्या ड्रिलिंग केले. पाईपद्वारे कामगारांना बाहेर काढण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. बाहेर पडलेल्या कामगारांची आरोग्य तपासणी सुरू आहे. उर्वरित कामगारांनाही एक एक करून बाहेर काढले जात आहे. एनडीआरएफच्या तीन तुकड्या बोगद्याच्या आत आहेत.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी बाहेर काढलेल्या मजुरांची भेट घेत आहेत. केंद्रीय राज्यमंत्री व्ही के सिंग हेही तिथे उपस्थित आहेत. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी बचाव कार्यात असलेल्या कामगार आणि जवानांच्या मनोबलाचे आणि धैर्याचे कौतुक केले. बाहेर काढण्यात आलेल्या कामगारांचे नातेवाईकही उपस्थित आहेत. बोगद्यातून बाहेर काढण्यात आलेल्या कामगारांचे प्राथमिक आरोग्य चेकअप बोगद्यात बांधण्यात आलेल्या तात्पुरत्या वैद्यकीय शिबिरात केले जात आहे.

## कोंडीजवळ मोटारीच्या धडकेने ट्रक चालकाचा मृत्यू

सोलापूर : पुणे महामार्गावरील कोंडी जवळ असलेल्या शिवराज ढाब्याजवळ वेगाने जाणाऱ्या मोटारीच्या धडकेने रस्त्याच्या कडेवर थांबलेला तरुण ट्रकचालक गंभीर जखमी होऊन मरण पावला.

हुसेन अ.गनी खंडूवाले (वय २५, नाईकवाडीगल्ली आळंद) असे मयत झालेल्या ट्रक चालकाचे नाव आहे. तो आळंद येथून मुंबईकडे ट्रक घेऊन निघाला होता.

कोंडी येथील धाब्याजवळ तो वाहन उभे करून जेवण आणण्यासाठी गेला होता. तेथून परत येत असताना पुण्याच्या दिशेने जाणारी (एमएच०९-जीएफ- ९८४८) या क्रमांकाचे ओमनी मोटर धडकल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला बेशुद्ध अवस्थेत शाहरुख शेख यांनी रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

## कर्देहळ्ळी-रामपूर शिवारात बिबट्यासदृश प्राण्याचा वावर

### शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण; बंदोबस्ताची मागणी


सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्दे हळ्ळी-रामपूर शिवारात बिबट्यासदृश प्राण्याच्या पायाचे ठसे आढळल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



दरम्यान, वनविभागाने उपाययोजना करून संबंधित प्राण्याचा बंदोबस्त करण्याची मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे. कर्देहळ्ळी-तोगराळी रस्त्यावरील पूर्व दिशेला नानासाहेब सावंत यांची शेती असून तेथे महिला कांदा पिकातील गवत खुरपण करीत होत्या. त्यावेळी अज्ञात प्राण्याच्या पायाचे ठसे आढळून आले. या महिलांनी ते ठसे सावंत यांच्या निदर्शनास आणून दिले असता सावंत यांनी मोबाइलवर तत्काळ त्याचे छायाचित्र घेतले. त्यावरून बिबट्या किंवा तरस असावा असे जाणकारांचे म्हणणे आहे. दरम्यान, वनविभागाच्या अधिकाऱ्यांनाही ते छायाचित्र पाठविले असता त्यांनी ते ठसे बिबट्याचे नसून तरस किंवा लांडग्याचे असावेत, असे स्पष्ट केले आहे. मात्र, परिसरातील नागरिक, शेतकरी व पशुपालकांनी खबरदारीचा उपाय म्हणून सतर्क राहावे, जनावरे, शेळ्या असतील तर बंदिस्त ठिकाणी बांधाव्यात, असे आवाहन केले आहे.ज्या ठिकाणी बिबट्यासदृश प्राण्याच्या पायाचे ठसे आढळले, त्या परिसरात ऊस शेती असून त्यामुळेच तेथे बिबट्या किंवा तरसचा वावर असावा असा नागरिकांना संशय आहे. या परिसरात मोठी वस्ती असून तेथील अनेक शेतकऱ्यांकडे जनावरे व शेळ्या आहेत. त्यामुळे भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने याठिकाणी भेट घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




तू तरी कशाला संधी सोडतोय !

कल्याण
146-13-139

मुंबई
169-66-268

## नान्नज यात्रेतील काम करून जाताना अपघात; तरुण ठार

सुराज्य/सोलापूर

नान्नज येथील ग्रामदैवत माहूरची आई मंदिरात यात्रेतील काम करून घराकडे पायी जात असताना पाठीमागून मोटर धडकल्याने विवाहित तरुण ठार झाला. हा अपघात आज मंगळवारी पहाटेच्या सुमारास नान्नज तालुका (उत्तर सोलापूर) येथे घडला.

सुरज बापू शेंडगे (वय २५ रा. नान्नज ) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो पहाटे ५ वाजता माहूरची आई मंदिरात यात्रेतील काम करून पायी घराकडे निघाला होता. त्यावेळी पाठीमागून (केए३८-एम- २७७०) या क्रमांकाची इंडिका मोटार धडकल्याने तो गंभीर जखमी झाला. शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.



मयत सुरज शेंडगे हा मजुरीचे काम करीत होता. त्याच्या पश्चात पत्नी, आई आणि एक विवाहित बहीण असा परिवार आहे. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली असून अपघातानंतर मोटर चालक वाहनासह पसार झाला. पुढील तपास हवालदार अत्तार करीत आहेत.

## मीच ओबीसी लढ्याचा जनक : ॲड.आंबेडकर

सुराज्य/पुणे

इतिहास पाहिला तर मीच ओबीसींच्या लढ्याचा जनक असल्याचे दिसेल. मंडल आयोगाचा इतिहास पाहिल्यावर तुम्हाला वस्तुस्थिती कळेल, असे वक्तव्य वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.मंगळवारी ते पुण्यात पत्रकारांशी बोलत होते.

आंबेडकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त फुले वाड्यात जाऊन अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बातचीत केली. देशात मुस्लीम आणि ओबीसी समाजाला लक्ष्य केले जात आहे. समाजामध्ये अशांतता निर्माण केली जात असून आंदोलनाशी संबंध नसलेल्या लोकांचा त्यासाठी वापर केला जात आहे. तीन दिवसांपूर्वी मुस्लीम संघटनांची मुंबईत एक बैठक पार पडली. मुस्लीम संघटना आठ डिसेंबर रोजी पॅलेस्टाईनच्या विषयावर सभा घेणार आहेत. मुस्लिम समाजाची सभा असल्याने भाजपा त्याकडे वेगळ्या नजरेने पाहत आहे.

दरम्यान, यावेळी पत्रकारांनी आंबेडकर यांना राज्यात चालू असलेल्या ओबीसी आंदोलनाबाबत आणि ओबीसींच्या आरक्षणाबाबत त्यांची भूमिका विचारली. यावर आंबेडकर म्हणाले, राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली राज्यात ओबीसी आंदोलन चालू आहे. भुजबळ यांनी आंबेडकरांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. यावर आंबेडकर म्हणाले, मला कोणाची गरज नाही. आंबेडकरवाद, फुलेवाद, शाहूवाद हा एवढा सक्षम आहे की त्याला कोणत्याही व्यक्तींची गरज नाही. त्या विचारात एवढी ताकद की ते शाश्वत आहे.



दरम्यान, आंबेडकर यांना प्रश्न विचारण्यात आला की, छगन भुजबळ हे ओबीसी आंदोलनाचं नेतृत्व करत आहेत म्हणून तुम्ही त्या आंदोलनात सहभागी होत नाही, असे बोललं जात आहे. यावर काय सांगाल. या प्रश्नावर आंबेडकर म्हणाले, तुम्ही पत्रकारांनी तुमचा इतिहास विषय सुधारून घ्यायला हवा. तुम्ही अभ्यास करायला हवा. जो ओबीसींचा लढा चालू आहे, या लढ्याचा जनक हा आंबेडकर आहे, हे लक्षात ठेवा.

### मीच तुरुंगातून बाहेर काढले

न्यायाधीश त्यावेळी भुजबळांना तुरुंगाबाहेर सोडत नव्हते. न्यायपालिका त्यांचा जामीन नाकारत होती. त्यावेळी मीच उलटा वार केला होता. न्यायपालिका जर व्यवस्थित वागली नाही, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही भुजबळांबद्दलचा निर्णय घेतला नाही तर संबंधित न्यायाधीशावर खटला चालवता येऊ शकतो, हे लक्षात घ्यावं असं मीच बजावलं होतं. त्याच्या पुढच्या दिवशी भुजबळांना सोडून देण्यात आलं. परंतु, भजबळ यांनी कधीच माझे आभार मानले नाहीत.